Goadoot, (Wednesday, 8th August 2018)

# मळकर्णेत महिलांना पाककलेसंबंधी मार्गदर्शन



**प्रशिक्षण शिबिरात सहभागी प्रशिक्षणार्थींसमवेत आमदार प्रसाद गावकर, सरपंच व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

**सांगे, दि. ७ (प्रतिनिधी)**

डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी गटाने मळकर्णे येथील महिलांसाठी दुधापासून पनीर व पपईपासून जाम बनवण्याचे प्रशिक्षण देऊन महिला गटांना स्वावलंबी बनवण्यासाठी कार्यशाळा घेतल्याबद्दल सांगेचे आमदार प्रसाद गावकर यांनी विद्यार्थी तुकडी 'कुशावती पिस्टन गटाला' शाबासकी दिली.

विद्यार्थी गट गावात अनेक प्रकारची प्रात्यक्षिके, गट चर्चा करून शेतकऱ्यांना मदत करत आहे.

आमदार प्रसाद गावकर यांनी कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार करण्यासारखे प्रशिक्षण दिले असून त्याचा फायदा घेण्यासाठी महिला स्वयंसाहाय्य गटांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

यावेळी उगेचे सरपंच संजय शिरोडकर, मळकर्णेचे पंचसदस्य संदेश गावकर, जुझे आल्फान्सो, सुरेखा जांबावलीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन अक्षय परब यांनी केले. भूषण सावंत देसाई यांनी आभार मानले.